**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## आजीवन अध्ययन व विस्तार विभागाद्वारे द्विदिवसीय राष्ट्रीय योग कार्यशाळेचे आयोजन

## देशभरातील मान्यवरांचे मार्गदर्शन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत पदव्युत्तर पदविका योग थेरपी व एम.ए. योगशास्त्र अभ्यासक्रमाच्यावतीने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या प्रेरणेतून व विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १९ व २० जून, २०२२ या कालावधीत राष्ट्रीय द्विदिवसीय योग कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत भारतातील विविध ठिकाणाहून आसन, प्राणायाम, पतंजली योग दर्शन, योगिक षटकर्म आदी विषयांवर मार्गदर्शन करण्याकरिता तज्ज्ञ मार्गदर्शकांना आमंत्रित करण्यात आले आहे. कोरोना काळात या संपूर्ण विषयाचा आपल्या शरीर स्वास्थ्यासाठी कितपत संबंध होता व शरीराला सुदृढ ठेवण्याकरिता या विषयांचा आपण दैनंदिन जीवनात कसा वापर करु शकतो, याबाबत मार्गदर्शन होणार असून आहारासोबतच योगिक क्रियांचा उपयोग, याची सविस्तर माहिती मिळणार आहे.

### कार्यक्रमाचे स्वरुप

दि. १९ जून, २०२२ रोजी सकाळी नोंदणी व त्यानंतर ९.३० वाजता बंगलोर येथील स्वामी विवेकानंद योगा अनुसंधान संस्थेचे कुलगुरू पद्मश्री डॉ.एच.आर. नागेंद्र यांचे हस्ते उद्घाटन संपन्न होणार आहे. कार्यशाळेचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख उपस्थित राहतील. प्रथम सत्रात 'इम्पॉर्टन्स ऑफ प्राणायाम इन कोविड - १९' या विषयावर रिसोर्स पर्सन म्हणून बरकतुल्लाह विद्यापीठ, भोपाळच्या योग विभागाच्या प्रमुख डॉ. साधना दौनेरिया, तर द्वितीय सत्रात 'योगिक सत्कर्म व प्राणायाम' या विषयावर महाराष्ट्र योगा कल्चर, नाशिकच्या सहसचिव डॉ. प्रज्ञा पाटील व्याख्यान देणार असून तृतीय सत्रात विद्यार्थ्यांशी संवाद साधतील.

दि. २० जून, २०२२ रोजी प्रथम सत्रात 'इफेक्ट ऑफ सत्कर्म ऑन रेस्पिरेटरी सिस्टीम' या विषयावर रिसोर्स पर्सन म्हणून गुवाहाटी येथील योगिक सायन्स ॲन्ड नॅच्युरोपॅथी महापुरुष श्रीमंत शंकरदेवा विभागाचे प्रमुख डॉ. उज्वल म्हस्के, द्वितीय सत्रात 'इम्पॉर्टन्स ऑफ आसन ॲन्ड प्राणायाम' या विषयावर विद्या व्हॅली स्कूल, एस.यु.एस., पुणेचे योग शिक्षक प्रो. सुप्रिया चाकोले, तृतीय सत्रात 'इंट्रोडक्शन ऑफ पतंजली योगदर्शन' या विषयावर स्पोर्टस् फेडरेशनचे नॅशनल योगासन रेफ्री प्रो. भूषण टाके, तर चवथ्या सत्रात 'योगा डेमॉनस्ट्रेशन ॲन्ड कल्चर प्रोग्राम' या विषयावर अनंत पंजाबराव देशमुख ॲकॅडेमी, अमरावतीचे डॉ. वैभव म्हस्के मार्गदर्शन करतील.

सदर कार्यशाळा निःशुल्क असून नोंदणीकरिता https://forms.gle/R2eR6kqAWZA3dC7X9 ही लिंक ठेवण्यात आली आहे. तरी द्विदिवसीय राष्ट्रीय योग कार्यशाळेचा जास्तीतजास्त संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले आहे.

---

प्रति,
मा.संपादक/जिल्हा प्रतिनिधी,
दै. ..................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १७/०६/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 143

This document was created with the Win2PDF "Print to PDF" printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/